CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



▶▶ महत्वाचे...

## पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते आज शासकीय ध्वजारोहण

**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार, दि.२६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय आवारात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोषाख परिधान करून वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पोलीस परेड ग्राऊंड, पोलीस मुख्यालय येथे सकाळी ९.१५ वाजता पालकमंत्री यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालय आवारात सकाळी ८.१५ वाजता जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. सर्व शासकीय कार्यालयांनी सकाळी ८.३० ते १०.०० वाजेदरम्यान ध्वजारोहण, शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करु नये. राष्ट्रीय ध्वज व राष्ट्रीय मानचिन्हाचा कोणत्याही प्रकारे अवमान होणार नाही याबाबत कटाक्षाने दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. नियमभंग झाल्यास भारतीय ध्वज संहितेनुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सांगितले.

## 'महावितरण'चा सहायक अभियंता लाच घेताना 'एसीबी'च्या जाळ्यात

**सोलापूर, दि. २५ जानेवारी**

घरावरील सोलार सिस्टीमच्या ऑनलाईन अर्जास मंजुरी देण्यासाठी लाच मागितल्याप्रकरणी 'महावितरण'च्या जुळे सोलापूर शाखेतील सहायक अभियंता 'एसीबी'च्या जाळ्यात अडकला आहे. अटक करण्यात आलेल्या लोकसेवकाचे नाव अमित विलासराव रेडेकर वय ४२ असे आहे. महावितरण शाखा कार्यालय, जुळे सोलापूर येथे सहायक अभियंता (वर्ग-२) या पदावर ते कार्यरत आहेत.




यातील तक्रारदार हे ग्राहकांच्या मागणीनुसार घरांवर सोलार सिस्टीम बसविण्याचे काम करतात. जुळे सोलापूर येथील एका ग्राहकाच्या घरावर ३.५ किलोवॅट क्षमतेची सोलार सिस्टीम बसविण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्यात आला होता. सदर अर्जास मंजुरी देण्याची जबाबदारी सहायक अभियंता अमित रेडेकर यांच्याकडे होती. मात्र, प्रति किलोवॅट १,००० रुपये या प्रमाणे तीन किलोवॅटसाठी ३,००० रुपये लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पथकाने पडताळणी केली असता लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यांना ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले.

# शिवसेना 'उबाठा' देणार मेंटल पॉवरद्वारे 'भाजपा'च्या विरोधात लढा : प्रा. अंधारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**



भारतीय जनता पक्ष हा धुतल्या तांदळासारखा, सत्शील पक्ष नसून कूटनीती, षडयंत्र, कपटनीती, कारस्थान करणारा पक्ष आहे. त्यांच्याकडे मनी, मसल तर आमच्या शिवसेना 'उबाठा'कडे मेंटल पॉवर आहे. याच पॉवरच्या जोरावर आम्ही भाजपाच्या विरोधात लढा देणार आहे, असे प्रतिपादन शिवसेना 'उबाठा'च्या उपनेत्या तथा सोलापूर जिल्ह्याच्या संपर्क प्रमुख प्रा.सुषमा अंधारे यांनी केले.

शिवसेना 'उबाठा'च्या सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. या अनुषंगाने त्या प्रथमच सोलापुरात आल्या होत्या. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्या पुढे म्हणाल्या, भाजपकडे जनता लोकाभिमुख राजकारण करणारा पक्ष म्हणून नव्हे तर निवडणूक यंत्रणा मॅनेज करणारा, साम-दाम-दंड-भेद, कपटनीती, अन्य पक्षातील कार्यकर्त्यांची पळवापळवी करणारा पक्ष म्हणून पाहते.

भाजपचे नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शतप्रतिशत भाजपकडे वाटचाल सुरु असल्याचे सांगत सन २०२९ च्या निवडणुकीत कोणाच्या कुबड्यांची गरज भासणार नाही, असे विधान केले आहे. शहा यांच्यात दर्प खूप आहे, पण मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मुंबईकरांनी हा दर्प पार चक्काचूर केला आहे, असेही त्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितल्या.

बार्शी येथे शिवसेनेच्या आमदाराकडून बार्शी पॅटर्न राबविला जात आहे, याकडे लक्ष वेधले असता त्या म्हणाल्या, बार्शी पॅटर्नचा निर्णय बार्शीच्या आमदारांनी स्वविवेकाला अनुसरून घेतला आहे, तो पक्ष संघटनेचा निर्णय नाही. यासंदर्भात शिवसेना पक्षप्रमुख आमदारांशी बोलतील. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सोलापुरात शिवसेना करमाळा, माढा, सांगोला आदी ठिकाणी चांगली लढत देत आहे. या निवडणुकीसाठी आम्हाला सात दिवस शिल्लक आहेत. या काळात निवडणुकीची स्ट्रॅटेजी ठरवणार आहोत.

एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी महाराष्ट्र हिरवेगार करू, असे विधान केल्यावर भाजपने प्रत्युत्तरदाखल सात पिढ्या गेल्या तरी ते शक्य होणार नाही असे म्हटले आहे. याबाबत विचारले असता प्रा.अंधारे यांनी सांगितले की, भाजप व एमआयएममध्ये नुरा कुस्ती सुरु आहे. अचलपूर, अमरावतीमध्ये भाजपने एमआयएमशी युती केली आहे. भाजपच्या झेंड्यातील हिरवा रंग म्हणजे एमआयएम का? भाजपच्या भगव्या कमळाखाली असलेला हिरवा देठ म्हणजे एमआयएम का? याचे उत्तर भाजपने द्यावे.

विरोधी पक्षांच्या पेन ड्राईव्ह, सीडी, झेरॉक्स कॉप्या आपल्याकडे आहेत, असे सांगायलाही त्या विसरल्या नाहीत. या पत्रकार परिषदेला शिवसेना 'उबाठा'चे जिल्हाप्रमुख डॉ.प्रा.अजय दासरी तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

### अनेक प्रकरणे बाहेर काढण्यात आली

उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संदर्भातील अनेक प्रकरणे बाहेर काढण्यात आली आहेत. धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे या मंत्र्यांची घेतलेली विकेट, संजय शिरसाट, संदिपान भुमरे यांची प्रकरणे, रामदास कदम यांच्या पत्नीच्या डान्सबारचे प्रकरण, भरत गोगावले यांच्या पालकमंत्रीपदाचा तिढा या गोष्टी वापरा आणि फेकाचे निदर्शक आहेत, असेही प्रा.सुषमा अंधारे यांनी सांगितले.

## श्री व्यंकटेश्वर देवस्थानम् येथे श्रींची पालखी मिरवणूक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

श्री सुर्यनारायण भगवान की जय... गोविंदा, गोविंदाच्या जयघोषात श्री व्यंकटेश्वर देवस्थानम् येथे रविवारी रथसप्तमीनिमित्त श्रींची पालखी मिरवणूक काढण्यात आली. सूर्यप्रभा वाहनातुन पालखी मिरवणुक काढण्यात आली. गुढीपाडवा ते मृग नक्षत्र या कालावधीत श्रीस उष्णतेपासून थंडावा मिळावा म्हणून चंदन अलंकार करण्यात आले.

या काळात देवाला अंगावर चंदनाचा सुगंधी लेप लावला जातो, ज्यावर मुकुट परिधान केले जाते. चंदनाच्या शुभ्र लेपामुळे श्रींची मुर्ती अधिक विलोभनीय दिसत होते. हे चंदन अलंकार रुप पाहण्यासाठी भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांना गुरुवार, दि.२९ जानेवारीपर्यंत चंदन अलंकार पूजा दर्शन घेता येणार आहे, असे सांगण्यात आले.





## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मॅरेथॉन स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्ष आणि प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-सोलापूर पंचमुर्ती नगर, केशव नगर व क्रीडा-भारती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य दिव्य तिरंगा मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

हिरा मोती चौक, जुना विडी घरकुल परिसरात सकाळी ७ वाजता या स्पर्धेस उत्साहात सुरुवात झाली. प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक सुनील इंगळे, बीएसएफ जवान युवराज कोंतम, क्रीडा भारतीचे अरुण उपाध्ये, नूतन नगरसेवक प्रथमेश कोठे, अजय पोन्नम, सतीश शिरसिल्ला आदींची प्रमुख उपस्थिती होती. या तिरंगा मॅरेथॉन स्पर्धेत लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. देशभक्ती, शिस्त आणि संघभावना वृद्धिंगत करणे, तसेच युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा व आत्मविश्वास निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. रा.स्व.संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असून, हा केवळ एक ऐतिहासिक टप्पा नसून राष्ट्रसेवेच्या अखंड, मूल्यनिष्ठ आणि समर्पित प्रवासाचा गौरवशाली उत्सव आहे.

संघसंस्थापक डॉ.केशवराव हेडगेवार यांनी समाजाचे संघटन करून चारित्र्यसंपन्न, शिस्तबद्ध व राष्ट्रनिष्ठ नागरिक घडवण्याचे ध्येय ठेवले होते. शरीराने सक्षम, मनाने सुसंस्कृत आणि राष्ट्रासाठी समर्पित नागरिक घडवण्याचा विचार संघाच्या प्रत्येक उपक्रमातून दिसून येतो. मॅरेथॉन स्पर्धेत ६८४ खेळाडूंनी भाग घेतला होता. सहभागी सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र तर विजेत्यांना ट्रॉफी व आकर्षक पारितोषिके प्रदान करण्यात आली.

### राहूल अस्वले, अनुष चिलका व श्रध्दा गुंटुक अव्वल

- **या स्पर्धेतील विजेते (प्रथम तीन) : मुले (२० वर्षांखालील) :** राहुल गिरप्पा अस्वले, कृष्णा अंबादास लोंढे, सुशांत दत्तात्रय लोंढे
- **पुरुष (२० वर्षांवरील) :** अनुष भास्कर चिलका, प्रतीक शशिकांत शिंदे, श्रीराम नवनाथ बंडगर.
- **महिला :** श्रध्दा केशव गुंटुक, तनवी आनंद जगणकर, तृप्ती श्रीनिवास कोंडा.
- **विशेष प्राविण्य :** रुद्र राहुल माने (वय-६ वर्षे)





## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

### सलग सुट्ट्यांमुळे दर्शनरांगेत भाविकांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ जानेवारी-**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरासह श्री विठ्ठल सभा मंडप, मंदिराचा आतील व बाहेरील परिसर तसेच श्री संत नामदेव पायरी येथे तिरंग्याच्या रंगसंगतीत विशेष विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दरम्यान, सलग सुट्ट्यांमुळे दर्शनरांगेत भाविकांची मोठी गर्दी होत आहे, असे मंदिर समितीचे प्र.व्यवस्थापक संदेश भोसले यांनी सांगितले.

श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, श्री संत तुकाराम भवन, श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास, वेदांता-व्हिडिओकॉन भक्त निवास आदी ठिकाणीही आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून परिसर देशभक्तीच्या वातावरणाने उजळून निघाला आहे. सदर रोषणाईसाठी सुमारे १०० एलईडी माळा, २५ फोकस लाईट्स तसेच १००ट्यूब लाईट्सचा वापर करण्यात आला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात आली.

संपूर्ण रोषणाई श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमार्फत करण्यात आली आहे. या कामाची जबाबदारी विद्युत विभाग प्रमुख शंकर मदने यांच्याकडे असून यासाठी सात कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. राज्य आणि परराज्यातून आलेल्या भाविकांना सुरक्षित, सुलभ व सुव्यवस्थित दर्शन मिळावे, यासाठी मंदिर समितीमार्फत आवश्यक व पुरेशा प्रमाणात सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.


दर्शन रांग अधिक सुलभ व जलद गतीने चालवण्यासाठी व्हीआयपी दर्शनावर निर्बंध घालण्यात आले आहे. टोकन दर्शन सुविधा तसेच भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा बंद ठेवण्यात आल्या आहेत. यामुळे सामान्य भाविकांच्या दर्शनाला प्राधान्य देण्यात येत असून दर्शन प्रक्रिया अधिक गतिमान व सुरळीतपणे पार पडत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## 'कलिंगड'च्या उत्पादनातून २ महिन्यांत मिळाले तब्बल '१४ लाख

### 'तामलवाडी टु सौदी' थेट मार्केटिंग पॅटर्न

### सेंद्रीय खतांमुळे मिळाला चांगला दाम

### बळीराजा भास्कर पवार यांची कमाल





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील भास्कर विष्णू पवार हे एक बागायदार शेतकरी...नेहमीच नवनव्या पिकांचे प्रयोग करण्यात त्यांचा हातखंडा... कधी द्राक्षाची नवीन व्हरायटी करणे तर कधी उसाचा प्रयोग... तर कधी टरबूज-कलिंगडे... इतकेच नाहीतर फळशेती-फुलशेती करण्यातही त्यांचा नेहमीच हातखंडा...! याच बहाद्दर शेतकऱ्याने यंदा आपल्या माळरान असलेल्या पावणेतीन एकरात कलिंगड्याचा नवा यशस्वी प्रयोग केला... अन् हिरव्यागार कलिंगड्याला मुंबईच्या एका एजंटाने हेरले अन् मुहँ माँगे दाम दिला... अन् या एजंटामार्फत तामलवाडीची कलिंगडे थेटऽऽ पोहोचली सौदीच्या बाजारात...!

अनेकदा सुपीक, काळीशार जमीन असूनही बळीराजाच्या पदरी निराशाच येते, असा अनुभव येवूनही आपली जिद्द व चिकाटी न सोडता तामलवाडीच्या एका जिद्दी शेतकऱ्याने चक्क खडकाळ माळरानावर 'मल्चिंग' अंथरली आणि यावर टरबुजाची बाग केली. या बागेला ८० टक्के सेंद्रीय अन् अवघे २० टक्के रासायनिक खताची मात्रा दिली. ही बाग चांगलीच बहरात आली आणि कलिंगडेही लगडली. नेहमीच शेतकऱ्याचा माल विदेशात निर्यात करणाऱ्या एका ओळखीच्या एजंटाला पवार यांनी गाठले आणि आपली बाग दाखविली.

ही बाग पाहताच त्या एजंटाने लागलीच कच्च्याच कलिंगड्याचा जागेवर व्यवहार करून ३ आयशर गाड्यांमधून ७० टन मालही नेला...अन् यातून एक-दोन लाख नव्हेतर तब्बल १४ लाखाचे उत्पादन या बहाद्दर शेतकऱ्याने घेतले. भास्कर विष्णू पवार या प्रयोगशील शेतकऱ्याने आपल्या घामातून पावणे तीन एकर माळरान जमिनीत ७० टन कलिंगडाचे उत्पादन घेतले. या माळरानावरील 'बाहुबली' कलिंगडे आता सौदी अरेबियातील ग्राहकांची तृष्णा भागवणार आहे.

याबाबत पवार यांच्याशी संवाद साधल्यावर त्यांनी सांगितले की, ६ बाय ६ च्या अंतरावर बेड तयार करून त्यावर प्लास्टिक मल्चिंग अंथरले. रासायनिक खतांच्या हव्यासाला फाटा देत त्यांनी ८० टक्के सेंद्रिय खते आणि औषधांचा वापर केला. ठिबकच्या प्रत्येक थेंबातून त्यांनी पिकाला मायेचे पाणी घातले. अडीच लाखांची गुंतवणूक आणि ६५ दिवसांची अखंड साधना केल्यानंतर माळरानावर हिरवीगार फळे लखलखू लागली.

पवार यांनी पिकवलेल्या कलिंगडाचा दर्जा इतका दर्जेदार होता की, थेट सौदी अरेबियातील व्यापाऱ्यांनी तामलवाडीच्या शिवारात धाव घेतली. माळरानावरील कलिंगडाची फुगवण आणि गोडवा पाहून व्यापा-यांनी बांधावरच १९ रुपये किलोचा विक्रमी दर जाहीर केला. शनिवारी एकाच दिवशी ७० टन मालाची तोडणी झाली आणि हा माल परदेशात रवाना झाला. अवघ्या ६७ दिवसांच्या कालावधीत अडीच लाखांच्या खर्चातून १४ लाखांचे उत्पन्न मिळवत पवार आदर्श निर्माण केला.

### माझ्या संपूर्ण कुटुंबियांचे यश

आज एका कलिंगडाचे तर वजन चक्क साडेसात किलो भरले आहे. हे यश केवळ माझे एकट्याचे नसून, पत्नीसह मुले विश्वास, विनायक आणि कुटुंबीय बाळासाहेब, विश्वजित पवार यांचे आहे. संपूर्ण कुटुंब शेतात राबले, तेव्हा कुठे माळरानाचा कायापालट झाला. शेती केवळ नशिबावर चालत नाही, तिला नियोजनाची जोड हवी. माळरान जमिनीत पाण्याचे योग्य नियोजन आणि सेंद्रिय खतांचा वापर केल्याने फळपिकाने मला आर्थिक बळ दिले. आज आमचा माल परदेशात गेला, याचा आनंद शब्दांत मांडता येणार नाही, असे भास्कर पवार या शेतकऱ्याने सांगितले.

### विषमुक्त शेतीचा 'तामलवाडी पॅटर्न'

गेल्या १० वर्षांपासून सेंद्रिय शेती मार्गदर्शक बसवराज मसुते आणि राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली पवार विषमुक्त शेतीचा प्रयोग करत आहेत. २० एकर शेतीत द्राक्ष, कांदा, सोयाबीन पिकवताना त्यांनी रसायनांना दूर ठेवले. तरुण शेतकऱ्यांनी केवळ नफ्यासाठी नाही, तर समाजाच्या आरोग्यासाठी सेंद्रिय शेती करावी, हा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी दिशादर्शक ठरत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३३८

जैसें कां स्वप्न मोहा । तो एकाकी देखिजे बहुवा ।
तोचि पाडु आत्मया । स्मरणेंवीण असे ।।

अर्जुना तुझ्यासारखा एकाग्रतेने श्रवण करणारा श्रोता मिळाल्याने मला खुप आनंद वाटल्याचे भगवंत म्हणाले, ज्ञेय, ज्ञाता, क्षेत्र, क्षेत्रज्ञ आदि सांगुन झाल्यानंतर भगवंत आता, महदब्रम्हत्र म्हणजे काय ? ते अर्जुनाला सांगु लागले आहेत. क्षेत्राच्या संगाने विश्व प्रसविण्याचे काम करून, विकारांना नाना प्रकारचे बळ ज्यामुळे प्राप्त होते, ते म्हणजे महदब्रम्ह होय. महदब्रम्ह हे जगाच्या लयाचे कारण असल्याने योग शास्त्रकारांनी याला अव्यक्त असे नांव दिले आहे. सांख्याच्या मतात परिणामी उपादानकारण म्हणून प्रकृती हे नांव संबोंधले आहे. वेदांत शास्त्रात यालाच माया असे म्हटले आहे. माया ही ब्रम्हाप्रमाणे अबाधित सत् नाही आणि वंध्यपुत्राप्रमाणे असत् नाही. ही माया या दोघाहूनही भिन्न व विलक्षण अशी आहे. या महदब्रम्हाला कितीही नावे दिली तरी कमीच आहेत. थोडक्यात ही प्रकृती म्हणजे अज्ञान होय. माणसाला स्वत:चा विसर पडणे, स्वत:ला स्वत:चे यथार्थ स्वरूप न कळने, हेच आज्ञानाचे मुख्य लक्षण आहे. माणसाची भ्रम व प्रभा ज्ञानरहित अवस्था म्हणजे अज्ञान होय. अज्ञानाने ज्याचा ज्ञान प्रकाश गुंडाळलेला/आवृत्त केलेला असतो त्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतात. मी अज्ञानी आहे म्हणुन अज्ञानाला महत्व आणायचे आणि मी ब्रम्ह स्वरूपाला जाणत नाही म्हणुन स्वत:च्या स्वरूपाला न जाणने हे या क्षेत्रज्ञाचे लक्षण आहे. यालाच प्रकृती पुरूषाचा योग असे म्हणतात. हा योग आत्मतत्वाचा स्वाभाविक धर्मच आहे. जीवात्म्याला स्वरूपाचे ज्ञान नसल्यास कोणती स्थिती प्राप्त होते, हे सांगतांना भगवंत म्हणाले, जैसें कां स्वप्न मोहा । तो एकाकी देखिजे बहुवा । तोचि पाडु आत्मया । स्मरणेंवीण असे ।। अर्थात, मनुष्य झोपला असता स्वप्नामध्ये अनेक रूपात स्वत:ला पाहतो. प्रत्यक्षात त्यातील काहीही खरे नसते. याच प्रमाणे जीवात्म्याला स्वरूपाचे ज्ञान नसेल तर स्वप्नाचीच अवस्था असते असे म्हटले तर चुक होणार नाही.



महदब्रम्हामुळे भुमी-आप-अग्नी, वायु, आकाश, मन, बुध्दी, अहंकार, या विकाराची निर्मिती होते. बुध्दीतत्व जेव्हा रजोगुनांनी भारले जाते, तेव्हा मन तयार होते. मनातुन अहंकार निर्माण होतो. पुढे त्यातुन पंचमहाभुताची निर्मिती होते. विषय इंद्रिये ही देखील या पंचमहाभुताबरोंबर आकाराला येतात. विकार वाढले म्हणजे गुणत्रय, वासना आकार घेवु लागतात. भगवंत हे सर्व स्पष्टीकरण मायेच्या अनुषंगाने अर्जुनाला सांगत आहेत. स्वप्नाचा विषय आजच्या ओवीत आला आहे. जास्तीत जास्त लोकांना स्वप्नात रेंगाळण्याची सवय असते. माणुस केवळ झोपेतच स्वप्न पाहतो असे नाही, तर जागेपणी सुध्दा स्वप्न पाहतो. झोपलेल्या माणसाला जागे करणे सोपे असते, पण जागेपणी झोपलेल्यांना जागे करणे अवघड असते. जागेपणी झोपलेल्यांना जागे करण्याचे काम केवळ संतच करू शकतात. आपण जागेपणी झोपणार नाही आणि स्वप्नातही रेंगाळणार नाहीत. कारण आपणाला माऊलींच्या ओव्याच्या सहवासात राहुन आपल्या जीवात्म्याला स्वरूपाचे ज्ञान करून द्यावयाचे आहे. जीवात्म्याला स्वरूपाचे ज्ञान झाल्यास जीव आत्मानंदी होतो याची आपणाला जाण आहे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## कांद्याच्या दरात ३०० रुपयांची घसरण ; बाजारपेठेत आवक वाढल्याचा परिणाम

**कांद्याच्या एकूण व्यवहारातून ७.५३ कोटींची उलाढाल : सचिव अतुलसिंग राजपूत यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीत यंदाच्या हंगामातील आतापर्यंतची सर्वाधिक कांदा आवक नोंदवली गेली आहे. बाजार समितीत तब्बल ८३६ ट्रकमधून सुमारे ८३ हजार ८३६ क्विंटल कांदा बाजारात दाखल झाला. मात्र, प्रचंड आवक झाल्याने कांद्याच्या दरात सरासरी प्रतिक्विंटल ३०० रुपयांची घसरण झाली असून कांदा उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. मात्र कांद्याच्या एकूण उलाढालीच्या व्यवहारातून सुमारे ७ कोटी ५३ लाख रुपयांची उलाढाल झाली. कांद्याला प्रतिक्विंटल ९०० ते २२०० रुपये असा सरासरी दर मिळाल्याची माहिती बाजार समितीचे सचिव अतुलसिंह रजपूत यांनी दिली.

सध्या बाजारात लाल कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू आहे. यंदा ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कांद्याचे एकरी उत्पादन घटले आहे. उत्पादन घटले असतानाच बाजारभाव अपेक्षेप्रमाणे न मिळाल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. सध्याच्या दरात उत्पादन खर्च तर दूरच, काढणी व वाहतूक खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. पुणे, सोलापूर, धाराशिव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह कर्नाटकातील बिदर, कलबुरगी, विजयपूर आदी भागांतून शुक्रवारी रात्रीपासून कांदा बाजारात दाखल होण्यास सुरुवात झाली. परिणामी हैदराबाद रस्त्यावर मार्केट यार्डसमोर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आवक जास्त असल्याने लिलाव तब्बल एक तास उशिरा सुरू करण्यात आला.

येथून विक्री झालेला बहुतांश कांदा हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई व तिरुवनंतपूरम या दक्षिण भारतातील शहरांकडे पाठवला जातो. मात्र, कांदा वाहतुकीसाठी ट्रकचा तुटवडा जाणवत होता. गेल्या वर्षभरात कांद्याच्या दरात फारशी वाढ झालेली नाही. त्यातच बांगलादेशसह शेजारील देशांमध्ये कांद्याची निर्यात अत्यल्प प्रमाणात होत असल्याने दरावर विपरीत परिणाम झाला आहे. दरम्यान, चीन व पाकिस्तानमधून कांद्याची आयात वाढत असून देशातील नाशिक, बंगळुरू व अहिल्यानगर बाजार समित्यांमध्येही आवक वाढत आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास कांद्याच्या दरात आणखी घसरण होण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून वर्तवली जात आहे.

## केंद्रप्रमुखांच्या २७०० पदांसाठी फेब्रुवारीत परीक्षा

**अडीच वर्षांपूर्वी ४५ हजार उमेदवारांचे अर्ज; प्रतीक्षेला अखेर विराम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

अडीच वर्षांपासून रखडलेली जिल्हा परिषद शाळांवरील केंद्रप्रमुखांची भरती प्रक्रिया अखेर मार्गी लागली असून राज्यभरातील २७०० केंद्रप्रमुख पदांसाठी ३ व ४ फेब्रुवारी रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे.

या परीक्षेसाठी सुमारे ४५ हजार उमेदवारांनी अर्ज केले असून, ही परीक्षा वस्तुनिष्ठ प्रश्नांवर आधारित असणार आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेत १९८ केंद्रप्रमुखांची पदे मंजूर असून, सध्या केवळ ५४ केंद्रप्रमुख कार्यरत आहेत. उर्वरित ४५ पदे पदोन्नतीने भरण्यात येणार होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) संदर्भातील आदेशानंतर पदोन्नती प्रक्रिया थांबली आहे. त्यामुळे आता सरळसेवेतून केंद्रप्रमुखांची भरती करण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यात सरळसेवेतून ९९ केंद्रप्रमुखांची नियुक्ती होणार आहे.

परीक्षेच्या पारदर्शकतेसाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. अडीच वर्षांपूर्वी उमेदवारांनी सुमारे सव्वाचार कोटी रुपयांचे परीक्षा शुल्क भरले होते.

आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पहिली ते आठवी इयत्तेत अध्यापन करणाऱ्या ५३ वर्षांपर्यंतच्या शिक्षकांना दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. केंद्रप्रमुख पदासाठी परीक्षा देताना टीईटी बंधनकारक नसले, तरी निवडीनंतर केंद्रप्रमुख म्हणून नियुक्तीसाठी टीईटी उत्तीर्ण असणे आवश्यक राहणार आहे.

### केंद्रप्रमुखांची पदे रिक्त; शाळा भेटींवर परिणाम

जिल्हा परिषदांच्या आठ ते दहा शाळांचा एक केंद्र म्हणून विचार करून प्रत्येक केंद्रासाठी एक केंद्रप्रमुख पद निर्माण करण्यात आले आहे. संबंधित केंद्रातील शाळांना नियमित भेटी देणे, शिक्षकांच्या कामकाजावर देखरेख ठेवणे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करणे, ही केंद्रप्रमुखांची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, राज्यात सध्या ६० टक्क्यांहून अधिक केंद्रप्रमुखांची पदे रिक्त असल्याने गुणवत्तावाढीचे उद्दिष्ट बाजूला पडले असून, सुमारे ४० टक्के केंद्रप्रमुखांनाच नियमित शाळा भेटी देता येत नसल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे.

## बॅरेल मधील पाणी घेण्यावरून महिलेला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

बॅरेल मधील पाणी घेण्यावरून झालेल्या वादातून महिलेला मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर जेलरोड पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दिनांक १८ जानेवारी रोजी दाजी पेठ परिसरात घडली. याबाबत रूपा कृष्णहरी सोमा राहणार दाजी पेठ बालाजी गार्डन अपार्टमेंट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबुबाई मार्कंडे बल्ला, ललित अरविंद बल्ला, रोहित अरविंद बल्ला, चेतन बल्ला यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. रुपा या फरशी धुण्यासाठी भरून ठेवलेल्या लहान बॅरल मधून पाणी घेत होत्या तेव्हा आरोपी अंबुबाई यांनी तू इथले पाणी घेऊ नकोस असे म्हटले, तेव्हा हा प्रकार घडला. तपास सय्यद करत आहेत.



## मेहता शाळेत तिळगुळ समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

कै. वि. मो. मेहता शाळेत तिळगुळ समारंभ व पालक सभेचे आयोजन शाळेच्या सभागृहात सर्वसाधारण पालक सभा व तिळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी प्रमुख अतिथी प्रा. पद्मश्री भोजे, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर, रेखा हेरलगे, शीतल जालिमिंचे यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथींचा परिचय सुनेत्रा मोहोळकर यांनी करून दिला. प्रमुख अतिथींचा शाळेतर्फे भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. संगीत शिक्षिका श्रुती कुलकर्णी, मधुरा छत्रे व भारती शिंदे यांनी तिळगुळ समारंभ निमित्त गीत सादर केले. शिक्षकांतर्फे सुभाषिनी पिल्ले यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार मयुरी दुरूगकर यांनी केले.

## आज अन् उद्या बँक कर्मचाऱ्यांचा देशव्यापी संप

**ग्राहकांना भासणार पैशांचा तुटवडा?**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी -**

प्रजासत्ताक दिनाची सार्वजनिक सुटी आणि मंगळवारी ऑल इंडिया एम्प्लॉइज युनियनच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या देशव्यापी आंदोलनामुळे बँका बंद राहणार आहेत. चौथा शनिवार, रविवार, सोमवार (प्रजासत्ताक दिन) आणि मंगळवार (बँक कर्मचाऱ्यांचा संप) असा हा कालावधी असल्याने ग्राहकांच्या बँकिंग व्यवहारांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. बँका बंद राहिल्यामुळे रोख रकमेची गरज भासणाऱ्या ग्राहकांची गैरसोय होणार आहे.

विशेषतः सलग चार दिवसांचा कालावधी लक्षात घेता एटीएममध्ये कॅशचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता बँकिंग क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे.

### संपात होणार ३ हजार कर्मचारी सहभागी

सोलापूर जिल्ह्यातील सुमारे तीन हजार बँक कर्मचारी या संपात सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या दिवशी बँकांसमोर द्वारसभा घेऊन आपल्या मागण्या शासन आणि बँक प्रशासनापर्यंत पोहोचवण्यात येणार आहेत.

### या आहेत मागण्या

ऑल इंडिया एम्प्लॉइज युनियनने मंगळवारी 'बँक बंद'चा निर्णय घेतला आहे. पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, राष्ट्रीयीकृत बँकांमधून मोठ्या प्रमाणावर कर्मचारी सेवानिवृत्त होत असतानाही नवीन भरती न झाल्याने उर्वरित कर्मचाऱ्यांवर वाढलेला कामाचा ताण कमी करावा, तसेच ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी पुरेशा कर्मचाऱ्यांची भरती करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

मात्र, या काळात नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, यूपीआय, एटीएम व इतर ऑनलाइन सेवा सुरू राहणार असल्याचे बँक प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांनी अत्यावश्यक व्यवहार वेळेत पूर्ण करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. आमचा देशव्यापी बंद हा ग्राहकांची गैरसोय व्हावी, हा आमचा उद्देश नाही. उलट ग्राहकांना चांगल्या व दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठीच हा लढा आहे, असे युनियनच्या नेत्यांनी स्पष्ट केले आहे. ग्राहकांनीही या आंदोलनाला समजून घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन युनियनकडून करण्यात आले आहे.



## हळदी कुंकू सण हा आनंदाचे प्रतीक : सोनल केत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

हळदी कुंकू हा एक पारंपारिक सामाजिक सोहळा आहे. सुवासिनी एकमेकींना हळद कुंकू लावुन सौभाग्यासाठी शुभेच्छा देतात. मकर संक्रातीच्या काळात महिला एकत्र येऊन हा आनंद साजरा करतात. हा समारंभ महिलांच्या मैत्री आणि आनंदाचे प्रतिक आहे, असे मत सोनल केत यांनी व्यक्त केले.

साने गुरुजी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची सहकारी पतसंस्थेच्यावतीने महिला सभासदांसाठी हळदी-कुंकू व तिळगुळ समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर नगरसेविका विजयाताई खरात, ज्ञानेश्वरी संगीतराव, आयेशा बिराजदार, महादेवी पाटील, फरजाना मरतुरे आदी उपस्थित होते. यावेळी नगरसेविका विजया खरात, ज्ञानेश्वरी संगीतराव यांनी आपल्या मनोगतामधून हळदी कुंकू समारंभाचे महत्व विषद केले. उपस्थित महिला सभासदांना यावेळी पतसंस्थेच्यावतीने भेटवस्तु देण्यात आली. सूत्रसंचालन संध्या सरवदे यांनी तर महादेवी पाटील यांनी आभार मानले.

## वृद्ध महिला भाजलेले अवस्थेत आढळली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील पेनुर येथे ६५ वर्षीय वृद्ध महिला भाजलेल्या अवस्थेत आढळून आली. हा प्रकार शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास अवघडकिस आला. सखुबाई गेना माने असे भाजलेल्या महिलेचे नाव आहे.

शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास सखुबाई या त्यांच्या राहत्या घरात भाजलेल्या अवस्थेत आढळल्या त्यांना रुग्णवाहिकेतील मोहोळ येथील रुग्णालयात आणण्यात आले, तिथे उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल केले असून त्या शुद्धीवर असल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हिल चौकीत झाली आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ. शु. अष्टमी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- अश्विनी (१३.३२)**
**योग - साध्य (०९.११)**
**करण - विष्टी (१०.१६)**
**राहू काल : सोमवार : स. ७.३० ते ९.००**

**दिनविशेष : दुर्गाष्टमी, प्रजासत्ताक दिन (१९५०): २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान अमलात आले आणि भारत एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक बनला २. राजमुद्रेचा स्वीकार (१९५०): सारनाथ येथील अशोक स्तंभावर आधारित भारताचे 'राजचिन्ह' आजच्याच दिवशी स्वीकारण्यात आले.**



## प्रभाग क्र. ८ मधील नागरी समस्यांचे दैनंदिन निराकरणासाठी नगरसेवकांची प्रत्यक्ष पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

प्रभाग क्र.०८ मधील नागरी समस्यांचे दैनंदिन स्वरूपात निराकरण करण्यासाठी नगरसेवक गौरीशंकर ऊर्फ प्रविण दर्गोपाटील यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. याच अनुषंगाने सकाळच्या सुमारास विणकर उद्यानात प्रभाग फेरीचे आयोजन करण्यात आले. या फेरीदरम्यान नगरसेवक दर्गोपाटील यांनी वॉकिंग ग्रुपचे सदस्य व स्थानिक नागरिकांसह उद्यानातील विविध समस्यांची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणीमध्ये उद्यानातील पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी, स्वच्छतेचा अभाव, विद्युत व्यवस्थेतील त्रुटी, उद्यानात पडून असलेले जुने बाद व अनावश्यक स्क्रॅप साहित्य तसेच काही ठिकाणी वॉकिंग ट्रॅकवरील असमतोल व धोकादायक भाग निदर्शनास आले. सदर समस्यांची उद्यानातील माळी व बाग रक्षकांच्या उपस्थितीत चर्चा व पाहणी करण्यात आली. समस्या लक्षात येताच नगरसेवक दर्गोपाटील यांनी संबंधित महापालिका अधिकाऱ्यांशी तात्काळ दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. उद्यान विभाग, विद्युत विभाग, सहाय्यक अभियंता, अवेक्षक आदी अधिकाऱ्यांना सूचना देत समस्यांचे त्वरित निराकरण करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले. विविध विभागांमध्ये समन्वय साधून तातडीची कार्यवाही सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. नगरसेवकांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे व कार्यक्षमतेमुळे वॉकिंग ग्रुपचे सदस्य व स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## गुरु तेगबहादूर सिंग : धर्म, मानवी अधिकार रक्षण करणारे विरक्त आद्यत्मवीर

**भारतीय संस्कृतीमध्ये देश आणि धर्मासाठी आणि अखंड मानवकल्याणासाठी व मानवी हक्क आणि सुरक्षेच्या रक्षणाकरिता स्वत:च्या प्राणाची ही परवा न करता आत्मबलिदान देणारे व आपल्या कर्तृत्वातून शिकवण व तत्त्वज्ञानातून समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण करणारे अनेक महापुरुष जन्मास आले. भारतीय संस्कृती ही जगभरामध्ये सौदार्यपूर्ण व्यवहार करणारी आणि सर्वसमावेशकतेचा आदर्श ठेवणारे विश्वबंधुत्वाची जननी आहे. भारताच्या मध्ययुगीन इतिहासामधील सत्ता आणि धर्म संघर्ष यातून निर्माण झालेली प्रादेशिक अस्मिता, राजवटी उदयास आल्या यातून भारतीय संस्कृतीचा समन्वयवादी दृष्टिकोन विकसित होत गेला. मध्ययुगात भक्ती चळवळीचा प्रचार व प्रसार होत होता. उत्तर भारतामध्ये धर्माचा जीवनवादी दृष्टिकोन, निर्गुण एकेश्वरवादी विचार ,मानवता ,विवेकवाद,गुरुग्रंथसाहेब शिकवणुकीस प्रमाण मानून त्यातील उपदेशाचे गेय पद्धतीने सिमरन (स्मरण)करत धर्म आणि मानवाचे रक्षणासाठी कार्य करणारा एक विचार आचार प्रवाह म्हणजे गुरू नानक देव यांनी स्थापन केलेला शीख धर्म होय.**

-----------------------------

शीख धर्मास दहा गुरूंची उत्तुंग अशी परंपरा लाभलेली आहे. अध्यात्मिक जागृती ,नैतिक मानवी मूल्यांची जपणूक करत, ईश्वराचे निराकार स्वरूप साक्षी मानून शीख धर्मच्या गुरूंनी अविरत कार्य केले.तत्कालीन कालखंडातील मुघल सम्राटांनी या मानवतावादी शिकवणी मुळे प्रसारित होणाऱ्या शीख धर्माच्या गुरूंना प्रतिरोध केला. यासाठी त्यांनी गुरुंन बरोबरच सामान्य जनतेवर देखील अनन्वित अत्याचार, अन्याय केला. शास्त्राचा उपयोग करून कट्टरवादी विचार अधिक घट्ट करण्याचा हेका ठेवला. यास प्रत्युत्तर म्हणून पाचवे गुरु अर्जुनदेवसिंग यांनी आध्यत्मिकते बरोबर जनरक्षण आणि धर्म रक्षणावर भर दिला.त्या नंतर सहावे गुरू हरगोविदसिंग यांनी पिरी आणि मिरी या संकल्पनेतून धर्मरक्षक तलवार ही संकल्पना जनमानसात रुजवली. आद्यात्मिक रक्षणासाठी पिरी तलवार जणरक्षण करण्यासाठी मिरी' तलवार ही संकल्पना रुजवली.

याच गुरू परंपरेतील एक तेजस्वी गुरु तेगबहादूर सिंग (१६२१-१६७५) हे अशाच महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांच्या रक्षणासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. म्हणूनच इतिहासात त्यांना हिंद दी चादर - म्हणजे हिंदू धर्माचे संरक्षण करणारे महान बलिदानी - असे गौरवले जाते. त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि साहित्यिक योगदान हे मध्ययुगीन भारतातील सामाजिक-धार्मिक संघर्षाचे जिवंत साक्ष्य आहे.

### गुरु तेगबहादूर सिंग यांचे पूर्वायुष्य:

गुरु तेगबहादूर सिंग यांचा जन्म १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु गुरु हरगोबिंद सिंग यांचे कनिष्ठ पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव शांत, अंतर्मुख आणि वैराग्यशील होता. युद्धकौशल्य, शस्त्रविद्या यांचे प्रशिक्षण त्यांनी घेतले असले तरी त्यांचा कल आध्यात्मिक साधनेकडे अधिक होता. त्यांनी दीर्घ काळ ध्यान, तपस्या आणि आत्मचिंतनात घालवला.गुरु तेगबहादूर सिंग यांची वृत्ती ही विरक्त ,आद्यत्मिक , वीर वृत्तीची होती.

### गुरु तेगबहादूर सिंग यांचे धार्मिक शिकवण आणि तत्त्वज्ञान व साहित्य :

त्यांची शिकवण ही निर्गुण भक्ती परंपरेशी निगडित आहे. संसार नश्वर आहे, ईश्वर निराकार आहे, अहंकार, लोभ व मोह हे बंधनाचे मूळ आहेत, नामस्मरणातून मुक्ती प्राप्त होते हे त्यांचे मूळतत्व आहे. त्यांच्या साहित्यामधील ११५ शबद श्री गुरु ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहेत. ही रचना विविध रागांमध्ये असून त्यामध्ये वैराग्य, आत्मज्ञान आणि जीवनाची क्षणभंगुरता प्रकर्षाने आढळते.

**गुरुबानी उदाहरण :** (शरीर, धन आणि कुटुंब - सर्व मिथ्या आहेत.) त्यांची भाषा साधी, पण अर्थगर्भ आहे. अलंकारांपेक्षा तत्त्वज्ञानात्मक आशय त्यांच्या काव्याताप्रधान आहे.

### औरंगजेब व मुघल सत्तेशी संघर्ष:

मुघल सम्राट औरंगजेब याची धार्मिक नीति कट्टर इस्लामी होती. त्याच्या कारकिर्दीत मंदिरध्वंस, जिझिया कर आणि जबरदस्तीचे धर्मांतर वाढले. औरंगजेबाच्या काळात हिंदूंवर, विशेषतः काश्मिरी पंडितांवर जबरदस्तीने धर्मांतर लादले जात होते.काश्मिरी पंडितांनी आपले धार्मिक स्वातंत्र्य वाचवण्यासाठी गुरु तेगबहादूर सिंग यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी पुढाकार घेतला. त्या वेळी त्यांनी औरंगजेबास स्पष्ट संदेश दिला की, जर मला इस्लाम स्वीकारायला भाग पाडले, तरच इतरांनी धर्मांतर करावे. औरंगजेबाला मात्र शेवटपर्यंत गुरू तेगबहादूर यांचे धर्मांतर करून त्यांना इस्लाम मध्ये परावर्तित करणे शक्य झाले नाही. औरंगजेबाने त्यांच्या या भूमिकेस अत्यंत द्वेषाने व कट्टरतेने उत्तर दिले व त्यांच्या दोन सहकाऱ्यांबरोबरच गुरू तेगबहादूर यांची ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात अनन्वित अत्याचार करून क्रूर हत्या करण्यात आली. गुरु तेगबहादूर सिंग यांचे हे बलिदान मानवी अधिकार व धार्मिक स्वतंत्र्य रक्षणासाठीचे प्रतीक आहे. त्यांचे हे बलिदान केवळ हिंदू धर्मासाठी नव्हते, तर सर्व धर्मांच्या स्वातंत्र्यासाठी होते. म्हणूनच त्यांचे बलिदान हे धर्मरक्षण या संकुचित अर्थापलीकडे जाऊन मानवी अधिकारांचे रक्षण ठरते यातून व्यापक अशी असलेली हिंद दी चादर उपाधी आणि संकल्पना समाजात रुढ झाली.

### धर्मरक्षण व मानवी अधिकारांचे संरक्षण

गुरु तेगबहादूर सिंग यांचे बलिदानाने हिंद दी चादर ही संकल्पना हे इतिहासातील मानवी अधिकारांसाठी दिलेले पहिले संघटित बलिदान मानले जाते. त्यांनी धर्म म्हणजे केवळ पूजा-पद्धती नव्हे, तर स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि विवेक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांचा विचार आधुनिक Right to Freedom of Religion या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

### समकालीन प्रस्तुतता

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात धार्मिक असहिष्णुता, मुलतत्ववाद आणि मानवी अधिकारांचे उल्लंघन वाढताना दिसते. अशा वेळी गुरु तेगबहादूर सिंग यांचे विचार अधिकच समकालीन ठरतात. त्यांचे जीवन हे धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता आणि नैतिक धैर्य यांचे आदर्श उदाहरण आहे. त्यांच्या प्रेरणेतू त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंग यांनी खालसा पंथाची स्थापना केली. आजही शीख समाजात त्यांचे बलिदान न्याय व सत्यासाठी उभे राहण्याची प्रेरणा देते. गुरु तेगबहादूर सिंग हे केवळ शीख धर्माचे गुरु नव्हते, तर मानवतेचे महान रक्षक होते. हिंद दी चादर म्हणून त्यांचे बलिदान आजही धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांचे सर्वोच्च प्रतीक आहे. त्यांचे तत्त्वज्ञान आणि साहित्यिक योगदान हे भारतीय संतपरंपरेतील अमूल्य वारसा असून, समकालीन समाजासाठी ते सदैव प्रेरणादायी राहील.

**- डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर,**
सोलापूर विद्यापीठ
मोबाईल : ९९२२५२०९८५

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### सोलापूरच्या आयटी पार्क मध्ये स्थानिक उद्योजकांना राखीव भूखंड ठेवा : वेदपाठक

**अक्कलकोट, दि.२५ जानेवारी-**

सोलापुरातील नियोजित आय. टी. पार्क येथे ५० हजार लोकांना काम मिळणार आहे. देशी विदेशी शेकडो श्रीमंत आय. टी. कंपन्यांना आपापले उद्योग उभारणीसाठी कमी किंमतीत भूखंड मिळणार आहे सोलापूर जिल्ह्याच्या मातीत जन्मलेल्यांना या नियोजित आय टी पार्क मध्ये संधी मिळणे आवश्यक आहे. सुशिक्षित तरुण मुलांना आणि नव उद्योजकाना सोलापुरातील नियोजित आय. टी. पार्क मध्ये दोन हजार चौरस मिटरचे १०० भूखंड राखीव ठेऊन मागणीनुसार संबधिताना कमी किंमतीत भूखंड देण्यात यावे अशा मागणीचे लेखी निवेदन स्वराज्य माहिती अधिकार संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने निवासी जिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना दिले. या निवेदनाची प्रत पुणे रोडवरील कार्यालयात एम.आय.डी.सी.चे सहसंचालक शिवाजी राठोड यांनाही देण्यात आली. स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष दिपक कांबळे, संस्थापक तथा राष्ट्रीय मुख्य महासचिव कमलेश शेवाळे, विश्वस्त तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा धनश्रीताई उत्पात यांच्या सूचनेनुसार आणि सर्व विश्वस्त, सर्व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष सुनील पंडित, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्रकुमार रघोजी, जिल्हा सचिव सुधाकर शहाणे, जिल्हा सरचिटणीस दत्तगुरु वेदपाठक, जिल्हा सरचिटणीस दिपक कुरुलकर, जि. कार्य. सदस्य अमोल शहाणे, जि. कार्य. सदस्य मोडनिंबचे अमर शिंदे, जि. कार्य. सदस्य दिलीप क्षीरसागर, जि. कार्य. सदस्य संतोष पोतदार आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### मोहोळमध्ये हळदी-कुंकू व मराठी भाषा संवर्धनाचा अनोखा संगम

**मोहोळ, दि.२५ जानेवारी-**

मोहोळ येथील व्यापारी मोफत वाचनालय व अखिल भारतीय ग्राहक पंचायत, मोहोळ तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हळदी-कुंकू व मराठी भाषा संवर्धन कार्यक्रमात महिलांचा सन्मान, पारंपरिक मूल्ये आणि मातृभाषेप्रती असलेली निष्ठा यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. कार्यक्रमास नगराध्यक्षा सिद्धी वस्त्रे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास, व्यापारी म ोफत वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.सुधीर जोशी, नगरसेविका साखराबाई बरकडे, क्षमा बारसकर, राजन घाडगे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्योत्सना जोशी, दत्तात्रय कुलकर्णी, गौतम क्षीरसागर, शहाजहान बागवान यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. राजन घाडगे यांनी प्रस्ताविक केले. ग्रंथपाल दिलीप देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. पूनम शिंदे यांनी आभार मानले. महिलांना तीळ-गूळ व वही, पेन वाटप करण्यात आले.

### रेल्वेच्या धडकेत एका महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

उत्तर सोलापूर मधील हिरज शिवारातील पुणे ते सोलापूर रेल्वे रुळाच्या लगत इलेक्ट्रिक पोलच्या जवळ रेल्वेच्या धडकेत एका म हिलेचा मृत्यू झाला. या महिलेचे वय ६० वर्षे असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. ही महिला शनिवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास जखमी अवस्थेत आढळली. तिला तालुका पोलीस ठाण्याचे पी.एम. बनसोडे यांनी शासकीय रुग्णालायात दाखल केले. डॉक्टरांनी मृत घोषित केले. दरम्यान ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

# नगरपालिका प्रशासनाचा वाहतूक शाखेला ठेंगा

- वारंवार मागणी करुनही नो एन्ट्रीचे पत्र मिळेना
- शहरातून अवजड वाहतूक बिनधास्तपणे सुरुच

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २५ जानेवारी-**

मंगळवेढा शहरात अवजड वाहनांची रीघ सुरु असल्याने नागरिकांना व शालेय मुलांना जीव मुठीत घेवून रस्ते ओलांडावे लागत आहेत. दरम्यान वाहतूक शाखेच्या पोलीसांनी पंढरपूर बायपास रोड व मरवडे रोड येथे जड वाहनास प्रवेश बंद असे फलक लावूनही बिनधास्तपणे वाहन चालक अवजड वाहने शहरात आणत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून नगरपालिका प्रशासनाने अवजड वाहतूक थांबविण्यासाठी नो एन्ट्री आदेशाची प्रत पोलीस प्रशासनास देणे गरजेचे आहे. वाहतूक पोलिसांकडून वारंवार मागणी असतानाही हे पत्र देण्याबाबत नगरपालिकेकडून ठेंगाच दाखवला जात आहे.

मंगळवेढा शहरातून रात्रंदिवस अवजड वाहने तसेच ऊसाने भरलेली डबल ट्रेलरची वाहने बिंधास्तपणे दिवसरात्र सुरु आहेत. दामाजी चौक शहराचे ह्दय म्हणून ओळखले जाते. येथेच माध्यमिक प्रशाला व ज्यु. कॉलेज तसेच काही अंतरावर पंचायत समिती कार्यालय व बसस्थानक असल्याने या चौकात मोठी गर्दी नेहमीच असते. यापुर्वी जवळपास अवजड वाहनामुळे डझनभर लोकांचा जीव गेला असतानाही नगरपालिका प्रशासन मात्र गांधारीच्या भूमिकेत आहे. अजून किती लोकांचा जीव जाण्याची नगरपालिका वाट पाहते असा प्रश्नही सूज्ञ नागरिक व जेष्ठ नागरिक प्रशासनास करीत आहेत. पंढरपूर बायपास व मरवडे रोड येथे अवजड वाहने शहरात येवू नये म्हणून कमान बसविण्यात आली होती. मात्र ती वाहनांनी पाडल्याने आता वाहनांचा मुक्तसंचार शहरामधून सुरु आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारीवरुन पंढरपूर रोड व मरवडे रोड या दोन ठिकाणी अवजड वाहनास नो एन्ट्री असे फलक लावलेले आहेत मात्र बाहेरच्या




राज्यातून आलेले वाहन चालक पोलीसांना नो एन्ट्री आदेशाची प्रतची मागणी करीत आहेत. नगरपालिकेच्या हद्दीतून हा रस्ता गेल्याने ही सर्व जबाबदारी नगरपालिकेची असून नगरपालिकेने नो एन्ट्री आदेशाची प्रत पोलीस प्रशासनास देण्याची गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. पोलीस प्रशासनाने याबाबत नगरपालिकेला पत्र व्यवहार करुनही नगरपालिका तोंडावर बोट हाताच घडी या अवस्थेत असल्याने नागरिकांना मात्र जीव मुठीत धरुन दामाजी चौकातून रस्ते ओलांडावे लागत आहेत. जिल्हाधिकारी यांनी या कामी गांभीर्यपूर्वक लक्ष घालून नगरपालिका प्रशासनाचे कान टोचावेत अशी मागणी या निमित्ताने शहरवासीयामधून पुढे येत आहे.

पोलीसांनी जवळपास आत्तापर्यंत १५ ते १६ बॅरीकेटस लावली होती. मात्र ही बॅरीकेटस वाहनचालकांनी मोडतोड केल्याने याचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात आले. शहरालगत असलेला बायपास रोड मध्यंतरीच्या पावसामुळे अत्यंत खराब झाला आहे. मोठ मोठे खड्डे पडल्यामुळे याच्या त्रासाला कंटाळून वाहन चालक शहरातून वाहन नेण्याचा प्रयत्न करीत असल्याचीही माहिती समोर येत आहे. पोलीस प्रशासनाने दि.१६ डिसेंबर रोजी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना लिखीत पत्र देवून शहरात नो एन्ट्री बाबतच्या अधीसुचनेची प्रत मिळणेबाबत पत्रव्यवहार करुन जवळपास तब्बल एक महिना उलटूनही नगरपालिका चिडीचूपच आहे. दि.२६/५/२०२५ रोजी प्रांत कार्यालयात सर्व अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत शहरातून होणारी अवजड वाहतूक रोखण्याकरिता मिटींग झाली होती. या मिटींमध्ये ३.५ मिटर उंचीची कमान बसविणे, तसेच मरवडे व पंढरपूर रोडवर १० बाय १० फुटाचे रिफ्लेक्टर नो एन्ट्रीचे बोर्ड बसविणे, गुगल व इतर मॅपवर रस्तेबाबत बदल करुन घेणे आदी निर्णय सदरच्या मिटींगमध्ये झाले होते. या बैठकीत घेतलेले निर्णय होवून तब्बल आठ महिन्याचा कालावधी लोटूनही नगरपालिका प्रशासनाचा अद्यापही या घटनेचे गांभीर्य न समजल्याने शहरातून वाहतूक बिंधास्तपणे सुरु आहे. आता तरी नगरपालिका प्रशासन दखल घेवून पुढील कार्यवाही करणार का? असा संतापजनक सवाल शहरवासीयांनी नगरपालिका प्रशासनास केला आहे.



## महिला वकिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

महिला वकिलांसाठी सोलापूर बार रूम येथे हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायमूर्ती स्मिता घारगे यांची उपस्थिती लाभली तसेच सर्व माननीय न्यायमूर्ती उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. स्नेहा पासनूर यांनी अतिशय प्रभावीरीत्या केले, तसेच कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार बारच्या सहसचिव ॲड. मीरा कैलाश प्रसाद यांनी केले.

हळदीकुंकू कार्यक्रमाचे सांस्कृतिक महत्त्व विषद करून आपली परंपरा व संस्कृती जपली पाहिजे, असा मौल्यवान संदेश आपल्या भाषणातून प्रमुख पाहुण्या स्मिता घारगेतसेच ज्येष्ठ वकील ॲड. अलका मोरे यांनी मनोगत व्यक्त केले.

### देगाव येथे वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**

शहरातील देगाव येथील हजरत बिलाल मशिदीजवळ रस्ता ओलांडताना एका ६५ वर्षीय वृद्धेचा अज्ञात वाहनाने धडक दिल्याने मृत्यू झाला. गुलशन आप्पासाहेब इनामदार राहणार आनंदनगर देगाव असे त्या मृत महिलेचे नाव आहे. ही घटना शनिवार दिनांक २४ जानेवारी रोजी सकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास घडली, त्या सकाळी राहत्या घराजवळ कचरा टाकण्यासाठी रस्ता ओलांडत असतानाही घटना घडली. अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिल्याने डोक्याला गंभीर मार लागला. त्यांना जखमी अवस्थेत सोलापूर शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत्यू घोषित केले.



## जलतारा प्रकल्पाची प्रत्यक्ष भेट आणि सोशल मीडियावर संयमाचा संदेश

**बार्शी, दि.२५ जानेवारी-**

कासारवाडी (ता.बार्शी) येथे सुरू असलेल्या बार्शीच्या बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात सकाळच्या सत्रात शेंद्रीय खाते, जलतारा प्रकल्प व शाश्वत शेती या विषयावर नानासाहेब कदम यांचे तर दुपारच्या सत्रात 'सोशल मीडियाचा अति वापर आणि त्याचे दुष्परिणाम' या विषयावर डॉ. महेश देवकते (मनोसोपचार तज्ज्ञ) यांचे व्याख्यान झाले.

कदम यांनी शेतातच विद्यार्थ्यांना सेंद्रिय खते कशी तयार करावीत याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतामध्ये जाऊन तेथील लागवड, पीक पद्धती व शेतीविषयक कामांची माहिती घेतली. यावेळी त्यांनी सांगितले की, शेंद्रीय शेतीमुळे मातीची सुपीकता वाढते, उत्पादनाची गुणवत्ता सुधारते आणि पर्यावरणाचे रक्षण होते. जलतारा प्रकल्पामुळे पावसाचे पाणी साठवून भविष्यातील पाणीटंचाईवर मात करता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षस्थानी प्रा. बी. व्ही. लिंगे होते. पारुल यादव व अंजली राऊत यांनी सूत्रसंचालन केले. प्रीती चांदणे हिने पाहुण्यांचा परिचय करुन दिला. नेहा हाके हिने प्रस्तावना केली. साईराज लांडगे याने आभार मानले. कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. ए. ढगे, डॉ. के. एम. माळी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बडे उपस्थित होते.

# मराठी भाषा आपली अस्मिता आहे

**कवी सुनील जवंजाळ; सांगोला न्यायालयात मराठी भाषा पंधरवडा साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ जानेवारी-**

संपूर्ण भारतात १४ कोटी हून अधिक लोकांची मातृभाषा ही मराठी आहे. मराठी भाषा आपल्याला जगण्यातली सर्वात मोठी श्रीमंती देत आहे. या भाषेवर आपण नितांत प्रेम केले पाहिजे. अभिजात दर्जा मिळालेली ही मराठी भाषा आपली अस्मिता आहे, असे प्रतिपादन कवी सुनील जवंजाळ यांनी केले.

ते राष्ट्रीय, राज्य तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने सोलापूरचे अध्यक्ष जिल्हा न्यायधीश एम.एस.शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली तसेच सचिव पी.पी.पेठकर यांचे सहकार्याने सांगोला तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ संघ, सांगोला यांचे संयुक्त विद्यमाने सांगोला



> मराठी भाषा संवर्धनासाठी परिसरातील लेखक मंडळी खूप कष्ट घेत आहेत, मराठी भाषा संवर्धनाची जबाबदारी ही प्रत्येकाची आहे प्रत्येकाने मराठी जपायला हवे, मराठीचा लळा वाढवायला हवा. आपणही मराठी भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करायला हवेत.
>
> **- पी.आर.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश, सांगोला.**

न्यायालयाच्या प्रांगणात आयोजित मराठी भाषा पंधरवडा कार्यक्रमात बोलत होते. यावेळी कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी सांगोला दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश पी.आर.कुलकर्णी, सह.दिवाणी न्यायाधीश ए.ए.पाटील, सांगोला विधीज्ञ संघाचे उपाध्यक्ष एस.बी. दिवसे, जि.प.प्रा.शाळा एखतपुरचे मुख्याध्यापक हणमंत जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ॲड. एम.एस.पत्की यांनी अभंग गायन केले. त्यानंतर जि.प.प्रा.शाळेच्या विद्यार्थिनी सानवी उबाळेनी सावित्रीबाई फ ुले यांचे जीवन चरित्र मांडले. मनस्वी जाधवनी कविता वाचन व एकांकिका सादर केली. श्वेता इंगोलेनी स्त्री पुरुष समानता यावर आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक ॲड. सचिन कुलकर्णी, सूत्रसंचालन ॲड.आर.जी.बाबर यांनी केले. प्रमुख वक्त्यांची ओळख ॲड.गजानन भाकरे यांनी करून दिली. आभार ॲड.एस.आर.सावंत यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांगोला न्यायालयाचे सहा.अधिक्षक ए.एस.बमनळ्ळी, डी.डी.मायभाटे, विधी सेवा समितीचे वरिष्ठ लिपीक डी.एम. डोईफोडे यांनी परिश्रम घेतले.

## बार्शीत श्री गणेश जयंतीनिमित्त अनेक ठिकाणी महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जानेवारी-**

श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त श्री भगवंत-लक्ष्मी मंदिर आवारातील श्री गणेश मंदिर व बार्शी शहरातील अनेक मानाचे गणपती व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून मुख्य गणेश मूर्तीस अभिषेक व पूजा करुन, दुपारी १२ वाजता फुलांची सजावट केलेल्या पाळण्यामध्ये छोटीशी गणेश म ूर्ती ठेवून, त्यांची आरती करुन श्रीगणेश जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

श्रीगणेश जयंती सोहळ्यानिमित्त शहरातील अनेक ठिकाणी गणेश मंदिरांसमोर पहाटे काकड आरती, भजन, कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी सामूदायिक अथर्वशीर्ष पठण करण्यात आले होते. श्रीगणेश जयंतीनिमित्त शहरातील गणेश मंदिरे हे आकर्षक फुलांच्या सजावटीने सजविण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. गणेश जयंतीचे औचित्य साधत अनेक सार्वजनिक मंडळाकडून मंदिर परिसरात दिवसभर भजन कीर्तन, धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, रक्तदान शिबीर यांचे आयोजन करण्यात आले होते. बार्शी शहरातील १७ वा पुठ्ठा गणपती, प्रसन्नदाता गणपती, जवाहर गणेश मंडळ भोसले चौक, भवानी पेठचा राजा, लालबागचा राजा सनगर गल्ली, अष्टविनायक गणेश मंडळ अलिपूर रोड, सौख्यदाता गणपती गवत गल्ली, सिद्धिविनायक गणपती मंगळवार पेठ, यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

# सेवा सहयोगद्वारा समाजातील वंचितांसाठी विविध प्रकल्प

**सेवा सहयोग फाऊंडेशन द्वारा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपल्या देशात तर सेवा इंटरनॅशनल द्वारा भारताबाहेरील देशांमध्ये शैक्षणिक,आरोग्य व महिला सशक्तीकरण, दिव्यांग क्षेत्रामध्ये विद्यार्थांसाठी, नागरिकांसाठी उल्लेखनीय कार्य करत असून याचा फायदा हजारो वंचित महिलांना तसेच विद्यार्थ्यांना होत असल्याचे सेवा सहयोग फाउंडेशन चे कार्यकारी संचालक शैलेश घाटपांडे यांनी सांगितले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कर्वेनगर येथील सह्याद्री प्रभात शाखेमध्ये अकराव्या व्याख्यानमालेच्या निमित्ताने शैलेश घाटपांडे बोलत होते.**

सेवा सहयोग द्वारे वस्तीमध्ये राहणाऱ्या गरीब व होतकरू मुलांसाठी स्कूल किट वाटप,विद्यार्थी विकास योजना,विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना,सेवा भोजन योजना,विविध वस्त्यांमधील तरुण मुलींसाठी किशोरी विकास योजना,द्वारा स्वच्छता व स्वास्थ्य जागृती,उर्मी प्रकल्प,व्यक्तिमत्व विकाससाठी विविध संस्कार,प्रशिक्षण शिबिरे,अभ्यासिका चालवत आहे.महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी महिला सशक्तीकरण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण व व्यवसाय उभारणीसाठी स्वावलंबन मार्गदर्शन,व्यवसाय मार्गदर्शन,समुतकर्ष योजना सुद्धा करीत आहे.याचा फायदा त्यांना होऊन अनेक महिलांनी आपले म हिला स्वयंसेवी बचत - गट स्थापन करून आपले छोटे उद्योग सुरू केले आहेत व स्वावलंबी झाले आहेत.दिव्यांग मुलांसाठी सेवा सहयोग ने तीन ठिकाणी केंद्र सुरू केले आहेत.

निर्मल वारी प्रकल्प तर अनेक वर्षापासून पंढरपूर वारी मधील वारीतील गावांमध्ये यशस्वी झाले असून अनेक उच्चशिक्षित



कार्यकर्ते स्वतः कार्य करीत आहे.यात दरवर्षी दिंडी चालक व वारकरी मंडळी,त्या त्या गावातील गावकरी,सरपंच,ग्रामसेवक यांचे या निर्मल वारी कार्यास सहकार्य लाभत आहे व ग्रामीण भागातील आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत असते.असेही शैलेश घाटपांडे यांनी सांगितले आहे.या निर्मल वारी कार्याची ची नोंद राज्य शासनाने पण घेतली आहे.

युवकांसाठी युथ फॉर सेवा जिज्ञासा योजना पण सम ाजात फार लोकप्रिय झाली आहे.याद्वारे तरुण मंडळी या सेवा कार्यात जोडली गेली आहे. शाळेतील मुलांना बालवयापासून बचतीची सवय लागावी म्हणूनमॅजिक गुल्लकअर्थात जादुई गुल्लक योजना नुकतीच सुरू केली आहे.याद्वारे नाममात्र शुल्क मध्ये बचत बँक- मॅजिक गुल्लक दिली जाते त्यावर आकर्षक अशी त्यावर चित्र रचना मुलांनीच तयार करून दररोज घरखर्चातून काही रक्कम शिक्षणासाठी बाजूला काढावयाची असते .यातून विद्यार्थ्यांना स्वतः बचत बँक -जादुई गुल्लक तयार करून त्यावर संकल्प चित्र रंगविण्यामध्ये मजा येते,आनंद मिळतो.अनेक शाळांमधून हजारो विद्यार्थी यात सहभागी होत आहेत.यवतमाळ जिल्ह्यातील काही शाळांम धील आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक स्वयंसेवी संघटनाद्वारे ही योजना लोकप्रिय व यशस्वी झाली आहे.

सेवा सहयोग द्वारे दर वर्षी सीएसआर निधीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जाते.यात बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच अनेक खाजगी कंपन्यांचे सी एस आर निधीचे संबंधित अधिकारी व स्वयंसेवी संघटनांचे पदाधिकारी संयुक्तपणे सहभागी होत असतात यावेळी त्यांना प्रत्यक्ष कामाचे,सी एस आर प्रोजेक्ट बनविण्याचे प्रशिक्षण दिले जाते. कोविड काळामध्ये सेवा सहयोगचे कार्य उल्लेखनीय होते.अनेक कंपन्यांमध्ये काम करणारे उच्चपदस्थ तरुण आय.टी.इंजिनियर्स तसेच व्यावसायिक उच्चपदस्थ,तरुण महिला कार्यकर्त्या यांनी कोविड मुळे दुर्दैवाने मृत्यू झालेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना वैकुंठ स्मशानभूमी मधील मदत व इतर आवश्यक मदतीसाठी स्वतःच्या जीवावर उदार होऊन दिवस रात्र प्रसंगी वैकुंठ मध्ये मुक्काम करून,स्वतः चे पैसे खर्च करून मोलाचे कार्य समाजसेवा म्हणून केले आहे. संघ शताब्दी वर्षामध्ये सेवा सहयोग च्या अनेक प्रकल्पांमध्ये सर्वांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याचे व सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी शैलेश घाटपांडे यांनी केले.सेवा सहयोग सेवा कार्यामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी व इतर माहितीसाठी शैलेश घाटपांडे सेवा सहयोग भ्रमण ध्वनी क्रमांक ९३७१०६७६८० यावर किंवा shaileshdggmail या मेल वर संपर्क करावा. सुरवातीस शैलेश घाटपांडे यांचा परिचय केशव माधव चे सचिव अरविंद देशपांडे यांनी करून दिला.कार्यक्रमास कर्वेनगर येथील शाखांचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**- शैलेश घाटपांडे, कार्यकारी संचालक, सेवा सहयोग फाऊंडेशन**



## झरेगावात एकता महिला मंचद्वारे अनिष्ट प्रथांना छेद; विधवांसह हळदीकुंकू कार्यक्रम

**वैराग, दि. २५ जानेवारी-**

समाजात आजही विधवा महिलांना मंगल कार्यांपासून दूर ठेवण्याच्या अनिष्ट प्रथांना छेद देत झरेगाव (ता. बार्शी) येथे 'एकता महिला मंच' ने विधवांसह सुवासिनींचा हळदीकुंकू कार्यक्रम घेतला.

जुनाट परंपरांना छेद देणारा एक क्रांतीकारी कार्यक्रम मकरसंक्रांतीचे औचित्य साधून 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' या अभिनव उपक्रमांतर्गत झाला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रम ाची सुरूवात झाली. यावेळी माजी सभापती लक्ष्मण संकपाळ, एकता महिला मंच प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, मंचच्या तालुका प्रमुख कविता दसवंत, तालुका कार्यकारणी सदस्या वसुधा कुंभार, रीना गुरव, अनिता दसवंत प्रभावती साबळे, पूजा भोसले आणि यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रभाकर क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले. केवळ भाषणे न ठेवता महिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात विधवा आणि सुवासिनी महिलांनी मिळून मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. उखाणे स्पर्धेत प्रथम क्रमांक लक्ष्मी संकपाळ,द्वितीय क्रमांक भाग्यश्री शिंदे तर तृतीय क्रमांक रीना गुरव यांचा आला. संगीत खुर्ची खेळात प्रथम क्रमांक सुदेशना संकपाळ, द्वितीय क्रमांक माया संकपाळ तर तृतीय क्रमांक स्वाती संकपाळ यांनी पटकावला. विजेत्या महिलांना म ान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

लक्ष्मी संकपाळ, शीतल संकपाळ, अश्विनी कुडपे, सरस्वती संकपाळ, छाया पोटभरे, नागर संकपाळ,जयश्री संकपाळ, स्वाती संकपाळ यांच्यासह गावातील महिलांनी परिश्रम घेतले. जयश्री संकपाळ यांनी सूत्रसंचालन केले. शीतल संकपाळ यांनी प्रास्ताविक केले. लक्ष्मी संकपाळ यांनी आभार मानले.

आपला जिल्हा



जिल्हा परिषद व पंचायत समितीची

रणधुमाळी





सोमवार, २६ जानेवारी २०२६


## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक

# अपक्षांना उद्या निवडणूक चिन्ह वाटप; अंतिम यादीही होणार जाहीर


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

पंचायत समितीच्या आखाड्यात अपक्ष म्हणून उतरलेले आणि अर्ज वैध ठरलेल्या उमेदवारांना आता २७ जानेवारी रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, याच दिवशी निवडणुकीत उतरणाऱ्या उमेवारांची अंतिम यादीही फायनल होणार आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा रणसंग्राम आता रंगात आला आहे. राजकीय पक्षांच्या चिन्हांवर निवडणूक लढविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक उमेदवारांसाठी एक मोठी अपडेट समोर आली आहे. ज्या उमेदवारांनी विविध पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल केले होते, परंतु वेळेत नमुना २ 'अ' व 'ब' (एबी फॉर्म) सादर करू शकले नाहीत, त्यांना आता



'वैध अपक्ष उमेदवार' म्हणून घोषित करण्यात आले आहे. यातील बऱ्याच जणांनी पक्षश्रेष्ठींच्या सांगण्यावरुन आपले अर्ज माघारी घेतले आहेत. ज्यांनी अर्ज माघारी घेतले नाहीत अशा अपक्ष उमेदवारांना या दिवशी निवडणूक



चिन्ह मिळणार आहे.

अनेकांनी राजकीय पक्षांचे चिन्ह मिळावे म्हणून अर्ज भरले होते, मात्र सूचकाची पूर्तता होऊनही तांत्रिक कारणांमुळे काहींना अधिकृत पक्षाचे चिन्ह मिळू शकले नाही. आता या उमेदवारांना अपक्ष म्हणून मैदानात उतरून आपली ताकद आजमावी लागणार आहे. २७ जानेवारीच्या या प्रक्रियेनंतर खऱ्या अर्थाने प्रचाराचा नारळ फुटणार आहे. या उमेदवारांना मंगळवारी दुपारी ३.३० नंतर निवडणूक चिन्हांचे (निशाणी) वाटप केले जाणार आहे. प्रशासनाने सर्व वैध उमेदवारांना या प्रक्रियेला प्रत्यक्ष उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. जर एखादा उमेदवार चिन्ह वाटपावेळी गैरहजर राहिला, तर त्याला निवडणूक आयोगाच्या नियमानुसार उपलब्ध 'मुक्त चिन्हांच्या' यादीतील अनुक्रमानुसार चिन्ह दिले जाईल, अस स्पष्ट केले आहे. यानंतर मतदान ५ फेब्रुवारी सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत तर मतमोजणी ७ फेब्रुवारी सकाळी १० वाजता पासून सुरू होणार आहे.

### गेटकेन उमेदवारांमुळे निष्ठावंत पदाधिकारी नाराज

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही काही ठिकाणी निष्ठावंत पदाधिकाऱ्यांना डावलून पक्षाने गेटकेन उमेदवारांना तिकीट दिले आहे. यामुळे काही निष्ठावंत भाजपा पदाधिकाऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना नाराजी व्यक्त केली. २५-३० वर्षे पक्षनिष्ठा ठेवून काम केल्याचे आम्हाला पक्षाने फळ दिल्याचीही प्रतिक्रिया त्यांनी नोंदविली. तरीही आम्ही आता पक्ष सोडून कोठेही जावू शकत नाही; दिलेल्या उमेदवारांचे काम करणे इतकेच आमच्या हाती असल्याचेही बोल त्यांनी बोलून दाखविले.

# जिल्हा परिषदेसाठी सात तालुक्यात भाजपा स्वबळावर



### सांगोला, करमाळा, माढा अन् बार्शी येथे अन्य पक्षांबरोबर युती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीची सध्या निवडणूक धामधुम चालू असून, सर्वच पक्षीय नेते आपल्या पक्षाच्या उमेदवारासाठी प्रचारयंत्रणा राबवित आहेत. या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने सांगोला येथे शिंदेंच्या शिवसेनेसोबत, तर करमाळा-माढा येथे राष्ट्रवादीसोबत महायुती केली आहे. तर बार्शीत दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, एमआयएम, वंचित आदी विविध पक्षीय नेत्यांनी भाजपाविरोधात आघाडी केली असल्याचे दिसून येत




आहे. तर उर्वरित ७ तालुक्यात भाजपा स्वबळावर लढत असल्याचे समजते.

यामुळे जिल्हा परिषदेच्या ६८ जागांसाठी चुरशीचे मतदान होणार आहे. सध्या वैध ठरलेल्या सर्व पक्षीय उमेदवारांनी प्रचाराचा शुभारंभ जोरात सुरू केला आहे. सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी डोअर टु डोअर प्रचारावर भर दिला असून, या उमेदवारांच्या प्रचारासाठी सर्व पक्षाचे राज्याचे प्रमुख येवून सभा गाजविणार आहेत. यामुळे मिनी मंत्रालयाचे राजकारण चांगलेच पेटल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी मतदान प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ६८ जागांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, रोजी ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता निकाल जाहीर होणार आहे.

जिल्ह्यात सध्या राष्ट्रवादी, भाजप अन् शिंदे सेनेच्यातच तगड्या लढती राहणार आहेत. मागील जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी- २५, भाजप+आघाड्या-१९, शिवसेना +आघाड्या-१०, शेकाप-३, भीमा परिवार-३, काँग्रेस-७ आणि अपक्ष १ असे बलाबल होते. यामुळे इतर पक्षाच्या टेकूने राष्ट्रवादीने सत्ता मिळविली होती. यंदाही भाजप, राष्ट्रवादी अन् शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांतच तगडी फाईट दिसून येणार आहे. तसेतर युती, आघाडीनंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

### पालकमंत्र्यांपुढे स्थानिक नेत्यांचे तगडे आव्हान

भाजपामध्ये महापालिकेप्रमाणे इतर पक्षातील काही नेत्यांची अजून इंट्री चालूच असल्याने सोलापूर महापालिकेप्रमाणेच भाजपाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी शह-कटशाहचे राजकारण होणार असल्याचे दिसते. दरम्यान, ग्रामीण भागातील दोन्ही राष्ट्रवादी आणि उबाठा पक्षातील काही जुन्या आणि बुजुर्ग स्थानिक नेत्यांपुढे पालकमंत्र्यांची जादू किती काम करणार? हे येणारा काळच ठरविणार आहे. कारण या निवडणुकीत सध्यातरी स्थानिकच्या तगड्या नेत्यांचेच पालकमंत्री गोरे यांच्यासमोर आव्हान आहे.

# चिणकेतील समस्या सोडवणार; माजी आ.पाटील यांचे आश्वासन

### ग्रामस्थांशी केली चर्चा

### युतीच्या उमेदवार खटकाळे यांच्या प्रचारार्थ गावभेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ जानेवारी -**

कडलास जि.प.गटाच्या शिवसेना-भाजप युतीच्या उमेदवार शोभाताई खटकाळे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने चिणके येथे माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी गावभेट दिली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांच्या विविध अडचणी जाणून घेत त्या तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.



> कडलास जि.प.गटातील नागरिकांच्या अडचणी व प्रश्न सोडवण्यासाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करू तसेच या गटामध्ये शासनाच्या सर्व योजना तळागाळापर्यंत व शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न राहतील. या गटातील जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी मतदार बंधू भगिनींनी उस्फूर्तपणे मला मतदान करून विजयी करावे. पुढील पाच वर्ष त्यांची सेवा करण्याची संधी द्यावी.
>
> **-शोभाताई खटकाळे**

यावेळी माजी जि.प.सदस्य अशोक शिंदे, माजी पं.स.सदस्य सुभाष इंगोले, माजी उपसरपंच मोहन मिसाळ, योगेश खटकाळे, युवासेना जिल्हा संपर्क प्रमुख सागर पाटील, उद्योगपती बाळासाहेब आसबे, आगतराव मिसाळ, ग्रा.पं.सदस्य भिमराव मिसाळ, अशोक शितोळे, तंटामुक्ती अध्यक्ष संजय मिसाळ, माजी ग्रा.पं.सदस्य कृष्णदेव मिसाळ, तानाजी कवठेकर, परमेश्वर गेजगे, लक्ष्मण येलपले, हणमंत येलपले, डॉ.बापू जाधव, बाळासाहेब कवठेकर, समाधान चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते नारायण मिसाळ, साहेबराव मोहिते, माणिक मिसाळ, अंकुश मिसाळ उपस्थित होते. शिवसेना-भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी या निवडणुकीमध्ये चिणके गावातून महायुतीच्या उमेदवार शोभाताई खटकाळे यांना जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन माजी आ. शहाजीबापू पाटील यांनी यावेळी केले. कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकजुटीने काम करत कोणत्याही परिस्थितीत चिणके गावातून बहुमत देऊ असा निर्धार व्यक्त केला.

# बार्शीत दुसऱ्या दिवशी जि.प.च्या चार तर पं.स.च्या एकाची माघार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ जानेवारी-**

बार्शी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.२४ जानेवारी रोजी जिल्हा परिषद सदस्य पदासाठी उमेदवारी दाखल केलेल्या ४ उमेदवारांनी व पंचायत समिती सदस्य पदासाठी दाखल केलेल्या एका उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज माघार घेतल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ.आर. शेख यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या पानगांव गटातून विकास जाधव, ओमप्रकाश पाटील, उपळाई (ठोंगे) गटातून चंद्रसेन ढाकणे, शेळगांव (आर) गटातून प्रियंका पंके या चार उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज माघार घेतले आहे. तर पानगाव पंचायत समिती गणातून ओमप्रकाश पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेतला आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषद सदस्य पदासाठी ६ गटातून ५२ उमेदवार व पंचायत समिती सदस्य पदासाठी १२ गणातून १०१ उमेदवार उमेदवार रिंगणात उतरले आहेत. २५ व २६ जानेवारी रोजी सुट्टीचा दिवस असल्याने, उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा शेवटच्या एका दिवसात म्हणजे मंगळवार दि. २७ जानेवारी रोजी आणखी किती उमेदवार आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतात याकडे संपूर्ण बार्शी तालुक्याचे लक्ष लागले आहे. कारण २७ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार असून, त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होणार आहे.

या निवडणुकीसाठी जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य या पदासाठी अनेक अपक्ष व पक्षाकडून इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले आहेत. अशा अपक्ष व इच्छुक उमेदवारांची मनधरणी करुन उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी आमदार दिलीप सोपल व माजी आमदार राजेंद्र राऊत गटाकडून कसोशीने प्रयत्न सुरु आहेत. त्यांच्या या प्रयत्नाला कितपत यश येते हे २७ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजल्या नंतरच समजेल.

# जि.प. अन् पं.स. साठीही भाजपाच्या अपेक्षा वाढल्या!

### पालकमंत्र्यांच्या प्रयत्नाने अनेकांची भाजपाला साथ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

जिल्ह्यात १२ नगरपालिका, सोलापूर महानगरपालिका निवडणुकांत आलेल्या यशानंतर आता पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आपला मोर्चा जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांकडे वळविला आहे. यामध्येही चांगल्या पध्दतीने आमच्या पक्षाला यश मिळेल, असा आशावाद त्यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे. इतकेच नाही तर ही निवडणूक जिंकण्यासाठी आमचे सर्व उमेदवार प्रयत्नांची पराकाष्टा करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. पालकमंत्री गोरे यांच्या प्रयत्नांमुळे काही भाजप निष्ठावंत पदाधिकाऱ्यांनी आपले अर्ज काढून घेतले असल्याचीही माहिती मिळाली.

जिल्हा परिषद, पंचायत समिती उमेदवारांसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे हेही चांगलेच परिश्रम घेताना दिसत आहेत. अगदी जे आहे ते स्पष्टपणे आपल्या भाषणातून बोलून आपली भूमिका मांडण्यात त्यांचा चांगलाच हातखंडा आहे. पालकमंत्री माध्यमांशी बोलताना नेहमी म्हणतात... आपला स्वभाव असाच आहे. आपण भूमिका घेऊन काम करतो.. माझा इतिहास नाही अन् भूगोलही नाही. माझा कारखाना नाही. बँक नाही. माझे वडील काही आमदार-खासदार नव्हते. आपला इतिहास आपणच लिहायला चालू केला. त्यामुळे फार काही चिंता करत नाही. हे साध्या पध्दतीचं बोलणं ग्रामीण भागात चांगलंच चालतं. त्यांचा आत्मविश्वास आणि जनमाणसांत मिसळणं याचाही फायदा भाजपा उमेदवारांना नक्कीच होत आहे.

काही दिवसांपूर्वीच जिल्ह्यातील बारा नगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल लागला. त्यानंतर विरोधकांसह काही जणांनी पालकमंत्री गोरे झाले फेल... निवडणुकीत भाजपा अपयशी... अशा आशयाचे निष्कर्ष काढले... कॉमेंट्स केले....! पण राजकारणात आकडे बोलतात, अफवा नाही. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापुरात येऊन नगरपालिकेच्या निवडणूक निकालावर खुलासा केला. या निवडणुकीत भाजपा अपयशी ठरला नाही. तर अपेक्षित यश मिळाले नाही, असे स्पष्ट केले आणि नगरसेवकांची मागील आणि आताची आकडेवारी जाहीर करून बाजी मारली. यानंतर महापालिका तर लिलया त्यांनी बहुमताने जिंकली. यामुळे आता जिल्हा परिषद निवडणुकीतही भाजपाला यश मिळेल, अशी अपेक्षा भाजपाच्या पदाधिकाऱ्यांना सध्यातरी वाटत आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात तसंतर दोन्ही राष्ट्रवादी, शिवसेनेचे तगडे आव्हान आहे... काही तगडे अपक्षही आहेत. या सर्वांना भाजपा उमेदवारांना टक्कर द्यावी लागणार आहे.

## जो जे व वांछील तो ते लाहो या उक्तीप्रमाणे

# ज्याला ज्या चिन्हावर लढायचे त्याला मुभा दिली एवढेच मी केले : दिलीप सोपल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ जानेवारी-**

जिल्हा परिषद आणि पंचायत निवडणुकीत मी काही घडवले नाही तर ते घडून आले आहे. पदाधिकाऱ्यांनी ते घडवले. जो जे व वांछील तो ते लाहो या उक्ती प्रमाणे ज्याला ज्या चिन्हावर लढायचे त्याला मुभा दिली एवढेच आहे. तुतारी अन घड्याळ एकच आहे. हे सर्व जमून आलं आहे. चांगली चांगली फुले, चांगल्या दोरीत गुंफण्याशिवाय पर्याय नसतो, मी सुईचे काम केले, अशी कबुली उद्धव सेनेचे आमदार दिलीप सोपल यांनी दिली.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित महाआघाडीच्या विजय निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विश्वास बारबोले, निरंजन भूमकर, उद्धव सेनेचे प्रवीण काकडे, शिंदेसेनेचे आनंद यादव, अध्यक्ष नंदकुमार काशीद, विक्रम सावळे, नागेश अक्कलकोटे, ओमप्रकाश पाटील आदी नेते उपस्थित होते.



सोपल पुढे म्हणाले, चांगलं काम करणाऱ्याला त्रास म्हणजे विकास नव्हे. चार हजार कोटी खरंच आले का, माहीत नसलेले रस्ते केले म्हणता, आणि रस्ते म्हणजे फक्त विकास नव्हे. समाज चहू अंगाने फुलला पाहिजे. आम्ही कितीतरी माणसे उभी केली. मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प उभे केले. अनेक संस्था उभ्या केल्या. विरोधक काय केलं म्हणतात ही एक गंमतच आहे. मी माणसं मोठी केली. मी स्वतः मोठा झालो नाही. मी माणसं कधी दाबली नाहीत. काही जणांचे हुक अडकले असतील. म्हणून ते तिकडे आहेत. रहा बाबा तिथेचं. निवडणूक कुठली आहे आणि उठसूठ शिवाजी महाराजांचं नाव घेत आहेत. विषय कुठला अन काहीही बोलत आहेत. मला तर त्यांना उत्तर सुद्धा देऊ वाटत नाही. विरोधकाला मोक्कार बोलायची सवय लागली आहे. कोण मागतय, कुणाची इस्टेट असे म्हणत विरोधकांवर टीका केली. त्यांना विकासच दिसत नसेल तर अआंधळेपणा म्हणावा लागेल.

तालुक्यातील पहिला सिमेंट बंधारा मी बांधला. नुसतं म्हणायचे काय केले चाळीस वर्षात. आम्ही आजवर ही विकास करत आलो आहोत. इथून पुढे आपले हे उमेदवार सत्तेत येणार आहेत. आता तुम्ही निधी आणणार आहात आणि मी तुम्हाला मार्गदर्शन करणार आहे. रिमोट तुमच्याकडे तर त्याचे सेल आमच्याकडे आहेत. आपलं भांडण कुठल्या पक्षाशी नाही. तर विध्वंसक प्रवृत्ती विरोधात आपली लढाई आहे असेही सोपल म्हणाले.

निरंजन भूमकर म्हणाले, भिण्याचे कारण नाही. आता आपल्यासोबत दोन उपमुख्यमंत्री आहेत. कामं कशी होतील ते ही आपल्याला कळेल. पोलीस स्टेशन असेल तर तहसीलदार असो आपलं काही अडणार नाही. कुणाला घाबरायचं कारण नाही. मतभेद बाजूला ठेवा. स्वतः सोपल उभा आहेत असे समजा.

विश्वास बारबोले म्हणाले, बार्शी तालुका राज्यात गाजतोय. असे करण्याची गरज का भासली. विरोधकांनी सत्तेच्या जोरावर गावागावात वेठीस धरून प्रवेश करून घेतले. हा विरोधी मनसुबा हाणून पाडला. आपल्याला सत्तेतील लोकं बोलवत आहेत. कुणी घाबरू नका. एसपी, कलेक्टर असो काही अडणार नाही. कार्यकर्त्यांना आधार मिळण्यासाठी सोपल साहेब यांनी ही युती घडवून आणली आहे. आपल्या अन त्यांच्या मतात जास्त फरक नाही. विधानसभेसारखं काम करा. ते चारी मुंड्या चित होतील. विधनसभेसारखं वर्क फ्रॉम होम करा. तिकडे गुंडगिरी, दडपशाहीचं वातावरण आहे. सत्तेचा फायदा आजवर आपल्याला होत नव्हता.तो आता होणार आहे. यावेळी वाहेद शेख, विकास जाधव, शिवाजी पवार, सुरेश कापसे, नागेश अक्कलकोटे यांनीही आपले विचार व्यक्त केले.